
पुरोगामी विचारांचे दैनिक
एकमत
www.dainikekmat.com
दिपोत्सव
२००९
किंमत १०० रुपये

# राशीफल वर्षभराचे



**सौ. नीलिमा प्रकाश प्रधान**
नीलिकाश ज्योतिष संस्था,
१५-२५२, राजेंद्रनगर, बोरिवली
(पूर्व) मुंबई - ४०० ०६६.
फोन : ०२२-२८४४०९६५,
२८७०५२७०

**मुंबईच्या बोरिवली व मालाड या उपनगरात वास्तव्य करणाऱ्या सौ. नीलिमा प्रकाश प्रधान या भारतातील एक मान्यवर ज्योतिष म्हणून ओळखल्या जातात. ज्योतिष हा अभ्यासाचा विषय मानून त्यांनी त्याची सातत्याने साधना केली. 'ज्योतिष महामहोपाध्याय' ही पदवी त्यांनी संपादन केली. सर्वसामान्य माणसापासून राष्ट्रीय नेत्यांपर्यंत अनेकांना त्यांनी ज्योतिषविषयक मार्गदर्शन केले आहे. श्रीमती इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, शरद पवार, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, सुशीलकुमार शिंदे, भाई सावंत अशा अनेक मान्यवरांना त्यांच्या अचूक भाकितांचा अनुभव आला आहे. २६ सप्टेंबर १९८४ रोजी दिल्लीतील निवासस्थानी श्रीमती इंदिरा गांधी यांनी सौ. नीलिमा प्रधान यांची भेट घेऊन चर्चा केली. दुर्दैवाने त्यांनी श्रीमती इंदिराजींबद्दल केलेले अशुभ भाकित खरे झाले. सौ. प्रधान यांनी ज्योतिषविषयक विपुल लेखन केले आहे तसेच वृत्तपत्रे, मासिक यातून भविष्यविषयक लेखन नियमितपणे केले आहे. दूरचित्रवाणीवरूनही त्यांनी ज्योतिषकथन व अन्य कार्यक्रम केले आहेत. 'भावस्वभाव', 'वेद विश्वासाचा', 'रत्नांच्या सहवासात', 'तुमचा तळहात तुम्हीच पाहा', 'वास्तुशास्त्र कोणासाठी, कशासाठी?', 'होमिओपॅथी व बारा क्षार','नक्षत्रावरून जीवनसाथी' अशी पुस्तके सौ. नीलिमा प्रधान यांनी लिहिली आहेत. सौ. प्रधान यांनी संगीताचा आणि फाईन आर्टचा अभ्यास केला आहे. त्यांची पेंटिंग्ज विदेशातही गेली आहेत. होमिओपॅथीचा त्यांचा व्यासंग आहे तसेच गृहसजावट हा त्यांच्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय आहे. बोरिवली पूर्व, राजेंद्रनगर येथे 'नीलिकाश ज्योतिष संस्था' या संस्थेत त्या सध्या भविष्यविषयक मार्गदर्शन करतात. त्यांचे पती श्री प्रकाश प्रधान व सुपुत्र नीलिकाश हेही ज्योतिषाचे अभ्यासक आहेत.**




**स्पष्ट व निश्चित ध्येयच माणसाला खडतर काळातही यशापर्यंत पोहोचवते.**

खडतर काळ सुरू झाला आहे. थोडी शनिची पीडाही सुरू झाली आहे. शनि षष्ठस्थानातून भ्रमण करीत आहे. २ नोव्हेंबरला राहु मात्र भाग्यस्थानात प्रवेश करीत आहे. १९ डिसेंबरला गुरु लाभस्थानात प्रवेश करीत आहे. परंतु मे मध्ये तो आपल्या व्ययस्थानात प्रवेश करीत आहे. मेपासून आपणास थोडे जास्त कष्ट घ्यावे लागणार आहेत. ध्येय निश्चित करावे लागेल. स्पष्ट व निश्चित ध्येयच आपणाला यंदाच्या वर्षाच्या खडतर काळातही नोकरी-धंदा, राजकारणात यश मिळवून देणार आहे. काळजी करू नका; परंतु काळजी घ्या. ग्रहांपुढे सगळ्यांनाच हात टेकावे लागतात. प्रयत्नांचा वेग दुप्पट-तिप्पट करावा लागतो. काही धक्केही बसतात.

१) सामाजिक व राजकीय- समाजकार्य करताना अनेक चांगले-वाईट अनुभव घ्यावे लागतात. या वर्षात तुमच्या चांगुलपणाची परीक्षा पाहिली जाईल. तुमच्यावर टीका होईल. तरीही तुम्ही प्रयत्नाने यश मिळवू शकाल. ग्रहांची साथ कमी असताना जिद्दच महत्त्वाची ठरते. मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागतील. नोव्हेंबरमध्ये वादाचे प्रसंग उद्भवतील. राजकीय क्षेत्रात तुमचे महत्त्व कमी होणार नाही. पदही राहील. नवीन पद मिळविण्यासाठी विरोधकांना मात्र शह द्यावा लागेल. मनःस्ताप होईल. रागावर नियंत्रण ठेवल्यास अपयश टाळता येईल. राजकारणात काही मुद्दे मे, जून महिन्यात



तुमच्यावर उलटवले जातील. जवळच्याच व्यक्तीपासून अडचणीत येण्याची शक्यता आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे माघार घ्यावी लागेल.

२) नोकरी व व्यवसाय- नोकरीत प्रमोशन मिळेल; परंतु कामाचा ताप जास्त होईल. श्रेष्ठत्व टिकविण्यासाठी तुम्हाला तारेवरची कसरत करावी लागेल. तुमच्यामागे कारस्थान रचले जाईल. वरिष्ठांच्या मनात गैरसमज करून दिले जातील. तेव्हा मे ते ऑगस्ट या महिन्यात चौकसबुद्धीने वागावे. आपले मनोगत व्यक्त करताना काळजी घ्या. व्यवसायात वर्षाचा पूर्वार्ध चांगला आहे. धंदा तेजीत राहील. नवीन ओळखी होतील. संधी मिळेल. गुंतवणूक करताना मात्र एप्रिलनंतर विचार करा. पत्रिकेनुसार याचा विचार वेगळाही असू शकेल. जूनमध्ये मोठे प्रलोभन समोर येईल. फसवणूक संभवते.

३) विद्यार्थी- मुलांनी ऑक्टोबर, नोव्हेंबर २००९ व मे, जून २०१० या कालावधीत वाहन जपून चालवावे. परीक्षा असल्यास अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. कोणतेही अनुचित पाऊल उचलू नये. छोट्या चुकीने नुकसान संभवते. परीक्षेत यश मिळावे यासाठी थोडी काळजी घेणे जरूरीचे आहे. म्हणजे वर्ष फुकट जाणार नाही. परदेशी शिक्षणाची संधी येईल. जानेवारी ते मार्च या काळात मनाप्रमाणे घटना घडतील. एप्रिल, मेमध्ये फसवणूक संभवते. मित्र व मैत्रीण दगा देतील. हुशारीचा उपयोग चांगल्या प्रकारे केल्यास मोठा फायदा पदरी पडेल.

४) साहित्य-कला-क्रीडा- लेखन चांगले होईल. कल्पनांना वाव मिळेल; परंतु प्रसिद्धी मिळण्यात अडचणी येतील. क्षुल्लक हेवेदावे यामुळे पद हातचे निसटते की काय असे वाटेल. तुम्ही सावध राहिल्यास

विरोधकांना गप्प बसवू शकाल. कला, क्रीडा क्षेत्रात प्रवेश करताना मोठी तडजोड करावी लागेल. दुखापत संभवते. ऑक्टोबर २००९ ते मे २०१० मोठे धाडस टाळावे. जूनमध्ये प्रयत्नपूर्वक काम मिळवावे लागेल. स्पर्धा जिंकताना अटीतटीचे प्रसंग येतील. जीत होईल; पण काठावर. वादापेक्षा संवाद साधल्यास जास्त पुढे जाता येईल.

५) कौटुंबिक- घरगुती वातावरण नरम-गरम राहील. सुखाची सर्व साधने असतील. नवीन वस्तू खरेदी होईल. नव्या वस्तूही घ्याल; परंतु तरीही मन उद्विग्न होत राहील. वादाचे प्रसंग येतील. दीपावली आनंदात साजरी कराल. फटाके फोडताना मुलांकडे लक्ष द्यावे. वारसाने धन मिळेल; परंतु वाद राहतील. कौटुंबिक स्वास्थ्य टिकवावे लागेल. या वर्षाच्या उत्तरार्धात जवळच्या व्यक्तीचा विरह संभवतो. कोर्टकचेरीच्या कामात अडथळे येतील. अनोळखी व्यक्तीशी जपून संबंध जोडावेत. अविवाहितांना जानेवारी ते मार्च चांगली स्थळे येतील.

नोव्हेंबर-डिसेंबर- नोव्हेंबरमध्ये कटकटी वाढतील. काही घटना घडल्या तरी पुढील काळासाठी त्या चांगल्या असतील. मानसन्मान वाढेल. बढतीचा योग. परदेशी जाण्याची संधी मिळेल.

जानेवारी-फेब्रुवारी २०१०- मनाप्रमाणे घटना घडतील. विरोध मावळेल. प्रेमप्रकरणात यश. व्यवसायात लाभ. जमिनीचे व्यवहार मार्गी लागतील. राजकीय क्षेत्रात दबाव राहील. परीक्षेत यश मिळेल. नव्या वळणाने प्रगती होईल.

मार्च-एप्रिल २०१०- महत्त्वाची कामे मार्चमध्ये करून घ्या. गाठीभेटी यशस्वी होतील. नवा प्रकल्प सुरू करता येईल. नव्या ओळखीचा फायदा होईल. लाभदायक घटना घडतील. एप्रिलमध्ये सावधपणे निर्णय घ्या.

मे-जून २०१०- वाहन जपून चालवा. कायदा मोडू नका. वादाने कुठलाच प्रश्न सुटत नसतो. शांतपणे विचार करून बोला व वागा. म्हणजे प्रश्न चिघळणार नाही. अभ्यासात कुचराई करू नका. वाकड्या वाटेने यश मिळणार नाही.

जुलै-ऑगस्ट २०१०- प्रत्येक क्षेत्रात सावधपणे निर्णय घ्या. संतापजनक घटना घडतील. स्वतःवर ताबा ठेवावा लागेल. विरोधकांना धडा शिकवता येईल; परंतु थोडे सबुरीनेच घ्या. अचानक दगाफटका संभवतो. नुकसान टाळा. प्रेमप्रकरणात फसवणूक. कोर्ट केसमध्ये त्रास व दगदग.

सप्टेंबर-ऑक्टोबर २०१०- ग्रहदशा प्रत्येकालाच भोगावी लागते. तुमचा विश्वास असो वा नसो. 'हत्ती गेला शेपूट राहिले.' थोडा मनःस्ताप होईल. परंतु पुढील वर्षासाठी त्या अनुभवांचा फायदा मात्र नक्की होईल. या महिन्यात डोळ्यांचा विकार त्रस्त करेल. व्यवहारात उधारीवर माल देऊ नका. स्वतःला कर्ज असल्यास प्रकरण त्रासदायक ठरेल. पुढील वर्षात मात्र कर्जमुक्त होता येईल.




**यंदाच्या वर्षात तुमचे ध्येय निश्चित करा. तुम्हाला कुठे जायचे हे निश्चित नसेल तर तुम्ही भरकटत राहाल.**

गेली अडीच वर्षे आपण फार त्रास सहन केलात. गेले वर्ष तर फारच कठीण होते. आता शनि महाराज आपणावर खुश झाले आहेत. मात्र २ नोव्हेंबरला आपल्या अष्टमात येणारा राहु आपल्या प्रकृतीवर ताण पाडणार आहे. नोकरी-धंद्यात काही समस्या निर्माण होतील. परंतु पैसाही भरपूर मिळेल. ७ डिसेंबरचे नेपच्युनचे राश्यांतर, १९ डिसेंबरचे गुरुचे राश्यांतर, २७ जानेवारीचे हर्षलचे राश्यांतर आपल्याला यंदाच्या वर्षात सर्वच क्षेत्रांत चांगले यश देणारे आहे. तेव्हा उगाचच कोठेतरी भरकटत राहू नका. ध्येय निश्चित करा, कामाला लागा. विजयश्री आपणास माळ घालेल.

१) सामाजिक व राजकीय- सामाजिक क्षेत्रात तुम्ही पुढेच राहाल. नावलौकिक मिळेल. प्रतिष्ठा व पैसा मिळवून तुम्ही जनतेसाठी ठोस कार्य करू शकाल. तुमच्या नावाचा गाजावाजा होईल. लोकमत तुमच्याकडे झुकेल. तेव्हा कामाचा वेग वाढवा. राजकीय क्षेत्रात तुमची जरब दाखवता येईल. मनोरथ पूर्ण करणाऱ्या घटना घडतील. पद मिळेल. पक्षश्रेष्ठींच्या मर्जीत तुम्ही राहाल. नोव्हेंबर, डिसेंबर हे महिने फायदेशीर ठरतील. चांगले व योग्य निर्णय घेता येतील. पैसा मिळेल; परंतु मिळणारा हा पैसा व्यसनासाठी उधळू नका. प्रकृतीवर ताण पडून चांगले वर्ष फुकट जाईल. क्षुल्लक व्यक्तींच्या सहवासात राहून महत्त्वाचे दिवस, आराम दवडू नका. मोठ्यांचा सहवास तुम्हाला मोठे करणार आहे.

२) नोकरी व व्यवसाय- नवीन नोकरी मिळेल. बेरोजगारांना काम नक्कीच मिळेल. प्रमोशन, बदली मनाप्रमाणे होईल. नोव्हेंबर महिन्यात कामाचा ताप वाढेल. डिसेंबरमध्ये परदेशी जाण्यासाठी तुमचे नाव घेतले जाईल. कामाचा वेग वाढून तुम्ही सर्वांच्या मनात उच्च स्थान मिळवू शकाल. वरिष्ठ तुमचा मान ठेवतील. पुरस्कार संभवतो. व्यवसायात तुम्ही अधिक भक्कमपणे पाय रोवू शकाल. धंद्यात अधिक वाढ करता येईल. व्यापक दृष्टिकोन ठेवल्यास व्यापक यश मिळवाल. परदेशी कंपनीशी संबंध येऊन फायदा होईल. भागीदार मिळतील. गुंतवणूक करता येईल. अर्थसाह्यसुद्धा मिळेल. म्हणून विचारांचा गुंता न करता कामाला लागा. जुलैमध्ये सावधपणे निर्णय घ्या.

३) विद्यार्थी- साधारण मार्क मिळविणाऱ्या मुलांनी अधिक अभ्यास केल्यास चांगले मार्क मिळतील. ग्रहमान तुमच्या साथीला आहे. आळस सोडून अभ्यासाला लागा. गुणवत्ता यादीत चमकता येईल. नवीन शिक्षण घेता येईल. तुमचा दबाव व तुमचे चातुर्य सर्वांच्या नजरेत भरेल. पुरस्कार मिळतील. नावलौकिक वाढेल. प्रेमप्रकरण गाजेल. परंतु कुठल्याही परिस्थितीत व्यसनी होऊ नका. डिसेंबरच्या परीक्षेत काळजी घ्या.ऑगस्टमध्ये कायदा पाळा. चमचमीत पदार्थांच्या सेवनाने पोटाचा त्रास होऊ शकतो.

४) साहित्य-कला-क्रीडा- तुमच्या लेखनाला चांगलीच प्रसिद्धी मिळेल. नव्या वळणाचे, नव्या ढंगाचे उत्तम लिखाण करता येईल. मन एकाग्र होईल. चांगली संधी मिळेल. साहित्य संमेलनात नाव होईल. अधिकाराचे पद मिळेल. कलावंतांना प्रतिष्ठा व पैसा मिळेल. विशेष भूमिका साकारता येईल. चाकोरीबाहेरचे कार्य करता येईल व लौकिक वाढेल. परदेशवारी होईल. क्रीडा क्षेत्रात अव्वल राहाल. निवड होईल. प्रसन्न मनाने खेळात लक्ष केंद्रित करता येईल. डिसेंबर ०९ मध्ये आर्थिक लाभ परंतु मानसिक तणाव राहील. जुलैमध्ये आरोप संभवतो.

५) कौटुंबिक -कौटुंबिक सुख मनाप्रमाणे मिळेल. जीवनसाथीच्या सहवासात प्रवास होईल. चांगल्या कार्यात मदत मिळेल. वास्तू खरेदी, मौल्यवान वस्तूंची खरेदी नवीन वर्षात होईल. वाहनसुख मिळेल. ऑक्टोबर-डिसेंबर २००९ मध्ये जेलसी वाढेल. मौल्यवान वस्तू सांभाळा. जुलैमध्ये नोकरांच्या त्रासाने वातावरण गढूळ होईल; परंतु फारसा परिणाम होणार नाही. एकंदरीत दीपावली सुखात जाईल व पुढील कालावधी अधिकच सुखावह असेल. अविवाहितांचा विवाहयोग जुळून येईल. शुभ संकेत मिळतील.

नोव्हेंबर-डिसेंबर २००९- निर्णय घेताना मनावर दडपण येईल. प्रकृती त्रास संभवतो. आप्तेष्टांसाठी दगदग होईल. सामाजिक क्षेत्रात थोडा तणाव वाढेल. राजकीय क्षेत्रात तटस्थ राहिल्यास वादळ शमेल. विद्यार्थ्यांनी वाद वाढवू नये.

जानेवारी-फेब्रुवारी २०१०- संक्रांत सणात मोठ्या उत्साहाने सहभागी व्हाल. सामाजिक क्षेत्रात नवा उपक्रम सुरू करता येईल. मौल्यवान वस्तूंची खरेदी कराल. राजकीय क्षेत्रात पद मिळेल. आनंदी वार्ता समजतील. नवीन परिचय होतील. व्यवसायात लाभ.

मार्च-एप्रिल २०१०- प्रगतीचा आलेख उंचावेल. व्यवसायात उन्नती करता येईल. कर्जाचा अर्ज मार्गी लागेल. नवा उपक्रम सुरू करता येईल. सरकार दरबारी अडलेले काम करून घेता येईल. राजकारणात तुमच्याभोवती लोक गर्दी करतील.

मे-जून २०१०- नोकरीत सुधारणा, प्रगती, मनाप्रमाणे घटना. सामाजिक कार्यात नावलौकिक मिळेल. जनतेसाठी सुधारणा करता येतील. राजकीय क्षेत्रात वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. योग्य ते निर्णय घेतल्याने समाधान मिळेल.

जुलै-ऑगस्ट २०१०- अचानक चांगल्या कामात अडथळे निर्माण होतील. द्वेष, हेवादावा यांचा त्रास होईल. तुमच्याविरोधात कट-कारस्थान रचले जाण्याची शक्यता. सर्व प्रश्नांची उत्तरे देताना तटस्थपणे राहून विचार करा. मीडियासमोर सामोपचाराने वागावे लागेल. खाण्यावर नियंत्रण ठेवा.

सप्टेंबर-ऑक्टोबर २०१०- कोडी उलगडतील. विरोधक तहासाठी पुढे येतील. आनंददायी घटना घडतील. प्रेमप्रकरणात यश. आर्थिक उलाढाली यशस्वी होतील. गुंतवणूक होईल. प्रॉपर्टी घ्याल.




**तीव्र इच्छाशक्तीच यंदाच्या वर्षात अडचणींवर मात करण्याचा मार्ग दाखवेल.**

शनि महाराज थोड्या काळाकरिता आपल्या राशीला आले आहेत. छोटी पनवतीच सुरू झाली आहे. २ नोव्हेंबरपर्यंत राहुची पीडा आहे. १९ डिसेंबरपर्यंत गुरु नाराज राहणार आहे. ७ डिसेंबरपर्यंत नेपच्युन आपणास पेचात पकडणार आहे. थोडक्यात डिसेंबरपर्यंत आपणास काही समस्यांना तोंड द्यावेच लागेल. २७ जानेवारीच्या हर्षल राश्यांतरानंतर साधारणतः मार्चपासून आपला प्रगतीरथ वेगाने धावू लागेल. वर्षाच्या सुरुवातीला येणाऱ्या अडचणींवर आपण तीव्र इच्छाशक्तीच्या जोरावर निश्चितच मात कराल. मारुतीची उपासनाच जास्त फलदायी ठरेल.

१) सामाजिक व राजकीय- समाजकार्याचा वेग मंदावलेला जाणवले. मागील कटू अनुभव अजून समाप्त झालेले नाहीत, परंतु होण्याच्या मार्गावर नक्की आहेत. सामाजिकपणे ज्यांनी कार्य केले आहे त्यांना फेब्रुवारी २०१० नंतर नक्कीच चांगले फळ मिळणार आहे. ज्यांनी कामात कुचराई, राजकारणात चालबाजी केली असेल त्यांना नोव्हेंबर व जानेवारी महिना संकटाचा जाणवेल. आरोप येतील, कायदा भंग या वर्षात तरी करू नये. कोर्ट केस संभवते. चांगल्या मार्गाने काम केल्यास मात्र चांगले अधिकार पदरी पडतील. राजकीय क्षेत्रात तुमचा दबदबा राहील.

२) नोकरी व व्यवसाय- शनि महाराज प्रामाणिक वृत्तीला नेहमीच मदत करतात. गर्व नको, चंचलपणा नको. निश्चय व मेहनत ठेवल्यास हर्षल व नेपच्युन ग्रह तुम्हाला नक्कीच मदत करतील. प्रमोशन मिळेल. मनाप्रमाणे स्थान मिळेल. परंतु चौकस राहा. एका कानाची गोष्ट दुसऱ्या कानाला नेणाऱ्या लोकांपासून सावध राहा. नियमांचे पालन व कायद्याचा आदर केल्यास पुढे जाता येईल.व्यवसायात भागीदारावर पूर्ण विसंबून राहू नका. तुमचे कर्तव्य, तुमची बुद्धी याचा वापर करा. गुंतवणूक वाढवता येईल. व्यवसायाचे स्वरूप मोठे करता येईल. चर्चा करा व विचारविनिमयानेच निर्णय घ्या. यश मिळेल.

३) विद्यार्थी- चालढकलपणा अंगाशी येईल. या वर्षात तुम्ही चांगले यश मिळवू शकाल. मागील वर्षात प्रयत्न करूनही तुम्ही यशस्वी झाला नसाल तर या वर्षात पुढे जाता येईल. आळसाने चांगली संधी फुकट जाते. ग्रहांची साथ आहे. तेव्हा प्रयत्नाचा वेग वाढविल्यास फार मोठे यश तुम्हाला मिळेल. परदेशी शिक्षण घेता येईल. नोकरीही मिळवता येईल. वाकड्या वाटेने यश मिळवायला गेल्यास भलत्याच प्रकरणत अडकाल. प्रेमप्रकरणात यश. चांगले मित्र शोधून ठेवा.

४) साहित्य-कला-क्रीडा- मिथुन राशी हे बुद्धीचे आगार आहे. त्यांनी जिद्द ठेवल्यास एक ध्येय डोळ्यांपुढे ठेवल्यास नक्कीच या वर्षात यशस्वी होता येईल. दूरदर्शीपणाचे लेखन होईल. मार्च–एप्रिल २०१० मध्ये गौरव होईल. आर्थिक लाभ होतील. कलावंतांना चांगल्या भूमिका साकार करण्याची संधी मिळेल. मोठ्यांचा सहवास लाभेल. प्रेमप्रकरण गाजेल. ून महिन्यात गौरवास्पद कामगिरी हातून घडेल व क्रीडा क्षेत्रात स्पर्धा जिंकता येईल. नव्या क्षेत्रात प्रवेश घेता येईल.

५) कौटुंबिक- मागील वर्षात झालेल्या चुका सुधारता येतील. नवीन संबंध जुळून येतील. संसारातील अडचणी कमी होतील. नोकरांचा त्रास कमी झाल्याने मनावरील ताण कमी होईल. मुलांच्या समस्या कमी होतील. जमिनीचे व्यवहार पूर्ण होऊन तुमचा वाटा तुम्हाला मिळेल. अविवाहितांना स्थळे येतील. प्रेमप्रकरणात घरातील विरोध कमी होईल. त्यामुळे घरगुती तणाव कमी होतील. जुने तुटलेले नाते परत चांगल्या पद्धतीने जोडता येतील. वास्तु खरेदी, वाहन खरेदी संभवते. कागदपत्र मात्र तपासून पाहा. मे महिन्यात आनंदाची बातमी कळेल.

नोव्हेंबर-डिसेंबर- दीपावलीमध्ये तुमचा मूड फारसा चांगला नसला तरी त्यानंतर तुम्ही सावरले जाल. डिसेंबरमध्ये मनाप्रमाणे घटना. आवडत्या व्यक्तीचा सहवास लाभेल. सासरकडून लाभ.

जाने.-फेब्रु.२०१०- सर्वच क्षेत्रांत मनाविरुद्ध घटना घडत आहेत असे वाटेल. उदास वाटेल. परंतु प्रमोशनची शक्यता आहे. प्रकृती सांभाळा. खाण्या-पिण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. अभ्यासात मुलांनी आळस करू नये.

मार्च-एप्रिल२०१०- प्रसन्न मनाने कामावर लक्ष केंद्रित करता येईल. नवीन खरेदी संभवते. मान-सन्मानाचे प्रसंग येतील. श्रेष्ठी तुमचा शब्द मोलाचा मानतील. नवीन नोकरीचे प्रयत्न करता येतील व आर्थिक लाभ होईल. परदेशगमनाची तयारी कराल.

मे-जून२०१०- सभा-संमेलनात भाग घेता येईल. जुने मित्र भेटतील. दुसऱ्याच्या उपयोगी पडाल. मानसिक समाधान मिळेल. नवा व्यवसाय सुरू करता येईल. कर्ज मिळवता येईल. प्रेमाची व्यक्ती भेटेल.

जुलै-ऑगस्ट२०१०- बेफिकिरीने वागून चालणार नाही. मौल्यवान वस्तू, महत्त्वाची कागदपत्रे सांभाळा. विश्वासघात संभवतो. विरोधकांचा त्रास जाणवेल. कटकटी होतील. सप्टेंबर-ऑक्टोबर२०१०- नवीन गुंतवणूक करताना सावधगिरी ठेवा. चांगल्या व्यक्तींचा सहवास लाभेल. प्रवासाचा बेत